| MHWS08000523-2024 | दाखल दिनांक : ०२/०४/२०२४<br>नोंदणी दिनांक : ०२/०४/२०२४<br>निकाल दिनांक : १७/०३/२०२६<br>कालावधी : ०१ व. ११ म. १५ दि. |
|---|---|

**भाग-'अ'**

**अर्ज क्र. ३२**

**(Title Page of the Judgment)**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ०६ कलम ४४(i) नुसार)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी(कोर्ट नं. २), रिसोड यांचे न्यायालयात**

**(समक्षः श्री. दिनेश मु. गायकवाड)**

**नि.फौ.ख.क्र.६८/२०२४** **नि. क्र.३८**

| | |
|---|---|
| **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस स्टेशन, रिसोड,<br>ता. रिसोड, जि. वाशिम. | **...फिर्यादी** |
| **विरुध्द** | |
| १. **विशाल गणेश खरात,**<br>वय - २८ वर्षे, धंदा - शेती,<br>२. **गणेश नारायण खरात,**<br>वय - ५५ वर्षे, धंदा - शेती,<br>३. **सौ. लता गणेश खरात,**<br>वय - ५० वर्षे, धंदा - घरकाम,<br>क्र.१ ते ३ रा. पळसखेड, ता. रिसोड जि. वाशिम,<br>४. **मनिषा पुरुषोत्तम सुलताने,**<br>वय - २९ वर्षे, धंदा - घरकाम,<br>५. **पुरुषोत्तम दिलीप सुलताने,**<br>वय - ३३ वर्षे, धंदा - शेती,<br>क्र.४ व ५ रा. गुंजखेड, ता. लोणार, जि. बुलढाणा.<br>६. **सोनु उर्फ सोनम धनंजय अवताडे,**<br>वय - ३५ वर्षे, धंदा - शेती,<br>रा. बाळखेड, ता. रिसोड, जि. वाशिम. | **...आरोपी** |

---

**दोषारोप**- भा.दं.वि. कलम ४९८-अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये.

---

उपस्थिती - श्रीमती एम. एच. मनवर - सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता
श्री. जी. पी. अवताडे - आरोपींतर्फे विधिज्ञ

---

**भाग–'ब'**

| अनु.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१. | गुन्हा घडल्याचा दिनांक | ०७/०७/२०२२ ते ३०/१०/२०२३ |
| ०२. | प्रथम खबर अहवाल दिनांक | ३०/१०/२०२३ |
| ०३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०२/०४/२०२३ |
| ०४. | दोषारोप निश्चिती दिनांक | १०/०२/२०२६ |
| ०५. | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १०/०२/२०२६ |
| ०६. | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | १७/०३/२०२६ |
| ०७. | न्यायनिर्णयाचा दिनांक | १७/०३/२०२६ |
| ०८. | निकाल सुनावनीचा दिनांक | १७/०३/२०२६ |

## आ रो पीं चा त प शि ल

| अ. क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हा कलम | निर्दोष किंवा दोषी | सुनावलेली शिक्षा | फौ.प्र.सं कलम ४२८ अंतर्गत भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | विशाल गणेश खरात, | फौ.प्र.सं. कलम ४१-अ प्रमाणे नोटीस | १०/०२/२०२६ | भा.दं.वि. कलम ४९८-अ,३२३,५०४ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष | - | - |
| ०२. | गणेश नारायण खरात, | | | | | | |
| ०३. | सौ. लता गणेश खरात, | | | | | | |
| ०४. | मनिषा पुरुषोत्तम सुलताने, | | | | | | |
| ०५. | पुरुषोत्तम दिलीप सुलताने, | | | | | | |
| ०६. | सोनु उर्फ सोनम धनंजय अवताडे, | | | | | | |

## भाग-क
## ( फौजदारी नियमावली प्रकरण ०६ कलम ४४(iii) नुसार )

## सा क्षी दा रां ची या दी

### (अ) अभियोगपक्ष/सरकार पक्ष -

| अनु.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१. | कल्याणी विशाल खरात | ३३ | फिर्यादी |
| ०२. | रमेश भागवत बोरकर | ३६ | साक्षीदार |

### (ब) बचाव पक्षाचे आणि (क) न्यायालयीन साक्षीदार असतील तर –

| अनु.क्र. | नाव सह कलम | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| — | — | — |

## कागदपत्रांची यादी न्यायालय निशाणी क्रमांक

### (ड) अभियोग पक्ष

| अ.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | फिर्याद | सही पुरता ३४ |
| ०२. | प्रथम खबर अहवाल | सही पुरता ३५ |
| ०३. | घटनास्थळ पंचनामा | - |
| ०४. | जप्ती पंचनामा | – |
| ०५. | एक्स-रे रिपोर्ट | – |
| ०६. | जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र | - |
| ०७. | फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे जबाब | वगळण्यात आले. |

### (इ) मुद्देमाल तपशिल–

| अनु.क्र. | साहित्य वस्तू | तपशिल |
|---|---|---|
| ०१. | - | - |

-----------------------------------------------------------------------------------

# न्या य नि र्ण य

(दि.१७/०३/२०२६ रोजी घोषित)

---

प्रस्तुत आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम ४९८–अ,३२३,५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन सारांशाने पुढील प्रमाणे –**

२. फिर्यादी कल्याणी विशाल खरात हिचे लग्न दि.०७/०७/२०२२ रोजी आरोपी क्र.१ सोबत रितीरिवाजाप्रमाणे मौजे रिसोड येथे झाले. लग्नाचा सर्व खर्च फिर्यादीच्या वडिलांनी केला. लग्नानंतर फिर्यादी ही आरोपी क्र.१ कडे पळसखेड येथे राहायला गेली. सुरुवातीचे काही दिवस आरोपी क्र.१ ने फिर्यादीस चांगले वागविले. त्यानंतर आरोपी क्र.२ व ३ यांनी लहान सहान कारणांवरुन फिर्यादीस त्रास देण्यास सुरुवात केली. आरोपी क्र.४ ते ६ हे देखील फिर्यादीने वडिलांकडून लग्नात आंधन व भांडे आणले नाहीत म्हणून त्रास देत होते. आरोपी क्र.४ ही फिर्यादीच्या कपाटाची चाबी घेवून कपडे फेकून देत असे. आरोपी क्र.१ हे मिलीट्रीमध्ये नोकरीत असून लग्नानंतर दीड महिन्यानंतर ते पळसखेड गावी आले. त्या काळात आरोपी क्र.२ व ३ यांनी तू इथे राहू नको वडीलांकडे जा असे म्हणून शारिरीक व मानसिक त्रास दिला. आरोपी क्र.४ व ६ यांनी फिर्यादी जवळील कपाटाची चाबी घेवून त्यामधील साडया व सोन्याचे दागिणे काढून घेतले. त्याबाबात फिर्यादीने विचारणा केली असता तिला लोटलाट केली. त्यानंतर फिर्यादी आरोपी क्र.१ सोबत भूज गुजरात येथे गेली असता आरोपी क्र.३ ही आरोपी क्र.१ यास फोनवरुन फिर्यादीविषयी काहीही सांगून भडकावून देत असत. फिर्यादी त्यानंतर पळसखेड येथे आली असता आरोपी क्र.२ ते ६ यांनी तिला मारहाण करुन त्रास दिलेला आहे. तसेच वडिलांकडून पैसे आण तरच घरी ये असे म्हणून दि.०७/०५/२०२३ रोजी तिला घराबाहेर काढून दिले. त्यानंतर फिर्यादीने पो.स्टे. रिसोड येथे दि.३०/१०/२०२३ रोजी सदरची फिर्याद दिली.

**३.** सदर फिर्यादवरुन पो.स्टे., रिसोड यांनी गुन्हा क्र.७१०/२०२३ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक सलिम रेघीवाले ब.नं.३९७ यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८ (अ), ३२३, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यासाठी दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** आरोपी हजर झाल्यानंतर आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८ (अ), ३२३, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्याकरिता दोषारोप (नि.क्र.१९) निश्चित केला होता. त्यातील मजकूर मी आरोपींना वाचून दाखविला व समजावून सांगितला. आरोपींनी त्यांच्यावर ठेवलेले आरोप नाकारले व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

**५.** दरम्यान फिर्यादी व आरोपींनी आपसातील तडजोड अर्ज (नि.क्र.३२) दाखल केले. परंतु सदर प्रकरणातील भारतीय दंड विधान कलम ४९८ (अ) हा गुन्हा आपसात मिटविण्याजोगा नसल्यामुळे मी सदर प्रकरण आपसात मिटविण्याची परवानगी दिली नाही.

**६.** अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या फिर्यादी व साक्षीदाराच्या जबाबाचे अवलोकन केले असता आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा येवू शकला नाही, त्यामुळे आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबानी नोंदविणेत आली नाही. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. एच. मनवर व आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. जी. ए. अवताडे यांचा युक्तीवाद ऐकला. फिर्यादीने केलेले कथन, आरोपींनी घेतलेला बचाव, अभिलेखावर आलेला पुरावा या सर्व परिस्थितीचा सारासार विचार केला असता खालील बाबी विचाराधीन उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणेः

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०७/०७/२०२२ ते दि.३०/१०/२०२३ चे दरम्यान ग्राम पळसखेडा, ता. रिसोड येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादीला 'पैसे घेऊन ये' असे म्हणून शारिरीक व मानसिक त्रास दिला व भा.दं.वि. कलम ४९८–अ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | नकारार्थी |
| २. | मुद्दा क्र.१ मधील कालावधीत व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस इच्छापुर्वक चापटाबुक्याने मारहाण केली व भारतीय दंड विधान कलम ३२३ सह ३४ प्रमाणे त्यांनी गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | नकारार्थी |
| ३. | मुद्दा क्र.१ मधील कालावधीत व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस इच्छापुर्वक शिवीगाळ केली व भारतीय दंड विधान कलम ५०४ सह ३४ प्रमाणे त्यांनी गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | नकारार्थी |
| ४. | आदेश कोणता ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत** :–

७. आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले. फिर्यादी (सा.क्र.१) कल्याणी विशाल खरात हिची साक्ष (नि.क्र.३३) वर व साक्षीदार क्र.२ रमेश भागवत बोरकर यांची साक्ष (नि.क्र.३६) वर नोंदविली. फिर्यादी

साक्षीदारा क्र.१ व रमेश साक्षीदार क्र.२ यांनी आरोपींनी फिर्यादीला माहेराहून पैसे घेऊन ये म्हणून शारिरीक व मानसिक त्रास दिल्याचे व मारहाण केल्याचे नाकारलेले आहे. फिर्यादी व साक्षीदार यांनी अभियोग पक्षाच्या कथनास सहाय्य केले नाही. त्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन त्यांना उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्यात आले. परंतु, त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा मिळेल असे काही त्यांनी सांगितले नाही. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षास उपयोगी ठरत नाही. फिर्यादीने फिर्यादीनुसार साक्ष न दिल्याने प्रकरणातील फिर्याद सिध्द झालेली नाही. याउलट फिर्यादीने असे मान्य केलेले आहे की, प्रस्तुतचे प्रकरण आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाले आहे. सदरचे तडजोडपत्र नि.क्र.३२ नुसार दाखल केले आहे.

८. अभियोग पक्षाने फिर्यादी व साक्षीदार क्र.२ यांच्या व्यतिरीक्त इतर कुणाचीही साक्ष नोंदविलेली नाही. फिर्यादीचा आणि आरोपींचा आपसात समझोता झालेला असल्यामुळे फिर्यादी व साक्षीदार यांनी घटनेबाबत सांगण्याचे टाळलेले आहे. त्यामुळे आरोपींनी संगनमताने फिर्यादीला क्रूर वागणूक दिली, मारहाण केली व शिवीगाळ केली याबाबतचा कोणताही पुरावा न्यायालयीन अभिलेखात दाखल नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

९. प्रस्तुत प्रकरणात अपील झाल्यास आरोपींच्या हजेरीकरीता फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–ए अन्वये आरोपींचे जामीन कदबे घेणे न्यायोचीत होईल.

**मुद्दा क्रमांक ४ बाबत** :–

**१०.** आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४९८ (अ), ३२३, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केला, हे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. म्हणून आरोपी हे निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत. आरोपी सदर

गुन्हयात गोवले जातील अशी परिस्थिती अभियोग पक्षाच्या पुराव्यात आढळून आली नाही. वरील सर्व विवेचनावरुन मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे :

## आदेश

१. सर्व आरोपींची भारतीय दंड विधान कलम ४९८ (अ), ३२३, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २४८ (१) अन्वये दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीनकदबे रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींचे जामीन कदबे रद्द करण्यात येतात तसेच आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–ए अन्वये दिलेले जामीन सहा महिन्याकरीता कायम ठेवण्यात येतात.

(न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला).

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2026.03.18 17:08:35 +0530

**(दिनेश मु. गायकवाड)**

दि.१७/०३/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,
न्यायालय क्र.२, रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original **Judgment.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | B. V. Bhisade (Grade III) |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 17.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 17.03.2026 |
| Order uploaded on | : | 18.03.2026 |